# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 24 ) 15th January, 1999 ( NO : 2

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

*(Registered under the Trade Union Act. 1926, No. By II-8162 of 1985 Affiliated to the All India Federation of University and College teachers' Organisations)*

**C.R.Sadasivan,** President **: Sambhaji Jadhav,** General Secretary

### PRESS NOTE

**For Favour of Publication**
**Mumbai, 11th Januaty, 1999.**

At the call of the MFUCTO, tens of hundreds of University and college teachers are staging a MASSIVE DHARNA at Mantralaya today, Monday, 11th January 1999 to protest against the Government's failure to issue the Government Resolution bringing into effect the new revised pay scales of university and College teachers with effect from 1.1.1996 inspite of the central government having issued its direction dated 27th July 1998 as amended by instructions dated 6th November 1998.

While central universities have already implemented the scheme in toto and even paid the arrears to teachers and some of out neighbouring states like Goa and Gujarat have also implemented the scheme in toto, the Government of Maharashtra is delaying the issuance of the GR. The teachers are agitated on account of this delay in view of the fact that the pay revision is being supported financially to the extent of **80 per cent of the total expenditure by the central government and the centre has in fact asked the states to work out the financial liability and claim the centre's share at an early date.**

2. The MFUCTO executive Committee met at Mumbai on Sunday, 10th January 1999 and resolved to take further action in case the government does not come out with the GR forthwith or in any case on or before 10th February 1999. **The MFUCTO action would begin from 11th February 1999 when teachers in Maharashtra will stage BLACK FLAG DEMONSTRATIONS at all district places against the Chief Minister and Dy. Chief Minister** whenever they visit the said places.

3. A copy of the Resolution of the MFUCTO is attached for further information.

(C.R.Sadasivan) ( Sambhaji Jadhaw)
President General Secretary
MFUCTO Mumbai, 11th January 1999

*******

*Extract of the MFUCTO Resolution on Movement adopted* ***at the EC meeting of the MFUCTO held on Sunday, 10th January 1999.***

"1. That this meeting of the Executive Committee of the MFUCTO views with grave concern **that the government of Maharashtra has failed to come out with the Government Resolution on the new revised scales of pay for University and College teachers in the State** though the government has been in possession of the central government direction dated 27th July 1998 as also the amended instructions dated 6th November 1998 issued by the HRD Ministry, inspite of more than 5 months having elapsed since the original central order, dated 27th July 1998.

2. That this meeting expresses its protest that inspite of the MFUCTO having submitted to the Chief Minister and the Minister for Higher & Technical Education, the said documents requesting them to issue the GR immediately and in any case on or before 31st December 1998 and **inspite of the fact that 80 per cent of the financial burden on account of the revision of pay scales will be borne by the central government** and inspite of the fact that the revised scales of pay have been implemented in the central universities and also in some of our neighbouring states such as Goa and Gujarat, the State government has neglected to issue the GR. till date.

3 That this meeting of the Executive Committee of the MFUCTO takes another opportunity of calling upon the state Government to issue the said GR on the basis **of the central direction dated 27th July 1998 as amended by central direction dated 6th November 1998, forthwith or in any case, prior to 10th February 1999.**

4. That this meeting resolves further that in case the state government fails to issue the GR on or before 10th February 1999, the teachers in Maharashtra will be compelled to take recourse to staging **Black Flag Demonstrations against the Chief Minister and the Dy. Chief Minister at all District places in the State whenever they visit the Districts starting from 11th February 1999,** and thereafter extend the said Demonstration to all the Ministers in the State, with effect from an appointed date.

5. That this meeting also resolves to issue **ADVERTISEMENTS in all News papers** on an appointed date highlighting the failure of the government of Maharashtra to come out with the GR for implementation of the revised scales of pay even after more than 6 months after the central direction.

6. That this meeting further decides to give a call to the teachers to resort to stoppage of work from any date to be intimated by the MFUCTO to them in due course, without giving any further notice to the government, the communication of this resolution being treated as due notice of the said stoppage-of-work action."

*******

## BLACK FLAG DEMONSTRATIONS

### against the Chief Minister and Dy. Chief Minister

# M I N U T E S

### of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the* 17th January,1999 at B. D. PARWEKAR MAHAVIDYALAYA, PANDHARKAWADA Dist. Yavatmal.

General Body of Nagpur University Teachers' Association met in the hall of B.D.Parwekar Mahavidyalaya, Pandharkawada Distt. Yavatmal at 12.00 noon on Sunday, the 17th January,1999. Prof.B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0017, 0044, 0048, 0072, 0090, 0129, 0137, 0153, 0166, 0181, 0257, 0259, 0260, 0311, 0370, 0380, 0388, 0389, 0400, 0423, 0454, 0455, 0496, 0509, 0550, 0551, 0552, 0559, 0581, 0582, 0583, 0585, 0654, 0661, 0662, 0663, 0664, 0738, 0794, 0807, 0892, 1006, 1056, 1113, 1118, 1161, 1170, 1177, 1178, 1221, 1251, 1262, 1305, 1350,1390, 1406, 1445, 1527, 1538, 1540, 1626, 1629, 1631, 1632, 1639, 1641,1651, 1700, 1701, 1714, 1715, 1782, 1889, 1948, 1958, 1959,1960, 2100, 2102, 2103, 2261, 2340, 2350, 2370, 2488, 2489, 2490, 2537, 2585, 2586, 2603, 2664, 2666, 2734, 2743, 2852, 2853, 2855, 2862, 2903, 2976, 2980, 3233, 3235, 3236, 3304, 3305, 3306, 3341, 3374, 3375, 3379, 3384, 3478, 3480, 3483, 3487, 3489, 3498, 3507, 3508, 3515, 3519, 3577, 3641, 3661, 3686.

## ITEM NO. : 237
## *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 17th May, 1998, at Shrimati Vimlabai Deshmukh Sabhagruha, Dr. Panjabrao Deshmukh Medical College, Shivaji Nagar, Amravati.

*Note :- Copy of the Minutes was circulated on page 43 to 46 of 1998 Nuta Bulletin.*

### विषय क्रमांक : २३७ (अ)
### प्रा. सौ. कविताबाई सु. पाटील यांचे दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

प्रा.सी.डी.कोंगरे यांनी प्रा.कविताबाई सु. पाटील यांचे दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.प.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस. जि. यवतमाळ या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाच्या माजी प्राध्यापिका सौ.कविताबाई सु.पाटील यांचे दि. १८ ऑगस्ट १९९८ रोजी दुःखद निधन झाले. त्या नुटाच्या सक्रिय सदस्या होत्या. स्वभावाने मनमिळावु आणि कुशल अध्यापन यामुळे त्या सर्वत्र लोकप्रिय होत्या. त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो. अतएव श्रद्धांजली या सभेच्या वतीने त्यांना अर्पण करण्यात येत आहे. त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत."

### विषय क्रमांक : २३७ (ब)
### प्रा. दादा मानकर यांचे दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

प्रा.अनिल सोमवंशी यांनी प्रा.श्री.दादा मानकर यांचे दुःखद निधनाबद्दल

---

**मानव संसाधन विकास मंत्रालय / शिक्षा विभाग**
***भारत सरकार, नई दिल्ली - ११० ००१.***
**Ministry of Human Resource Development**
**Department of Education : Government of India**
**New Delhi 110 001. December 5, 1998**

Dear Prof. Bhattacharyya,

As you are aware, the revised pay scales of teachers were communicated to UGC vide our letter dated 27th, July 98. This was supplemented by another letter dated 6th November, 98 wherein certain improvements were made following negotiations with you. We have since released an amount of Rs. 150.00 Crores. to the UGC for payment of arrears and implementation of the revised scales in Central Universities. **Simultaneously, we have also requested the State Governments to submit proposals to the Central Government for reimbursement of 80% of the additional expenditure** for implementation of the revised pay scales for teachers of their universities and colleges.

As a part of the package of settlement of the agitation, the Central Government had agreed that some specific schemes would be drawn up by the UGC. **These schemes have since been drawn up by the UGC and are under active consideration of the Government.** However, these schemes are independent of the implementation of the revised pay scales, including payment of arrears.

We have already requested the UGC to take urgent steps for the implementation of the revised scales and to issue any notification, if so required, **so that teachers can draw revised scales alongwith the payment of arrears in one instalment.**

In view of the above, I request you to kindly not to proceed for any agitational course of action and wait for appropriate orders from the UGC in this regard. I trust AIFUCTO would continue to play the same constructive role it has been playing so far.

with regards,

Yours sincerely,
**(P.R.Dasgupta)**

**Prof. Mrinmoy Bhattacharyya,**
General Secretary, All India Federation of University & College Teachers' Organisations. 6/6, Kalicharan Ghose Road, Calcutta.

---

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS.**
(Regd, Under Act. xxi of 1860)

**19/c, Nilmani Mitra Street, Calcutta-700 006 Postal Address : 6/6, Kalicharan Ghose Road, Calcutta- 700 050 : Dated 7.12.1998**

To
All members of the National Executive Committee.&
All affiliated organisations.
C-13-98

Dear Friend,

The secretariat of AIFUCTO in its meeting held on 6.12.98 reviewed developments since the last annual conference and decided the following-

1. The court arrest programme proposed to be held on 14.12.98 is deferred to 27.1.98.
2. All affiliated units are requested to organise demonstrative actions in state capitals on 4.1.98 to persuade state governments to initiate steps to implement revised scales of pay 80 p.c. of arrears should be taken by all state govts. from central Govt.. latest by 31.3.99 and paid to teachers.
3. Programme of demonstration at Chandigarh in support of teachers of Haryana and against their victimisation will be held on 15.12.98.
4. All units are requested to take part in appropriate solidarity actions in support of Bharat Bandh on 11.12.98.

A letter from Union education Secretary is given at the reverse.

Greetings.

Yours fraternally,
**(Mrinmoy Bhattacharyya)**
General Secretary.AIFUCTO

मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथील वाणिज्य विषयाचे प्राध्यापक श्री. दादा मानकर यांचे दिनांक १६.१.१९९९ रोजी सायंकाळी हृदय विकाराच्या झटक्याने देहावसान झाले. ते नुटाचे सक्रिय सदस्य होते. श्री. शिवाजी महाविद्यालय अकोला येथे अध्यापनाचे कार्य करतांनाच त्यांनी कृषि, नाट्य, पत्रकारीता, समाजकार्य आदी क्षेत्रात भरीव कार्य केले. आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार, शेतीमित्र, दलीतमित्र, स्व. वसंतराव नाईक प्रतिष्ठानचा कृषि भूषण व कृषि लेखक असे विविध पुरस्कार दादांनी विभूषित केले. अमरावती विद्यापीठाच्या सिनेटचे ते सदस्य होते. त्यांच्या आत्मास सद्‌गती लाभो अशी श्रद्धांजली या सभेच्या वतीने त्यांना अर्पण करण्यात येत आहे."

## विषय क्रमांक : २३७ (क)
## प्रा. डॉ निशिकांत चाउत्रे यांचे दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

प्रा. डॉ. एकनाथ कठाळे यांनी प्रा.डॉ.निशिकांत चाउत्रे यांचे दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"नागपूर येथील व्ही.एम.व्ही.जे.एम.टी. महाविद्यालयातील वाणिज्य विषयाचे जेष्ठ प्रा.डॉ.निशिकांत नारायणराव चाउत्रे यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी दि. २२ डिसेंबर १९९८ रोजी अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले.

प्रा.चाउत्रे हे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक होते. सदैव प्रसन्न व हसरे व्यक्तिमत्व लाभलेले प्रा. चाउत्रे हे नुटा संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. ते महाविद्यालयातील नुटा स्थानिक शाखेचे अध्यक्ष होते. नुकत्याच झालेल्या प्राध्यापकांच्या देशव्यापी संपात त्यांचे योगदान महत्वाचे राहीले आहे. त्यांच्या निधनामुळे नुटा संघटनेचा एक प्रामाणिक आणि धडाडीचा कार्यकर्ता आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या आत्माला सद्‌गती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना."

## विषय क्रमांक : २३७ (ड)
## प्रा. सौ.सुषमा साठे यांचे दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

प्रा.डॉ.एकनाथ कठाळे यांनी प्रा.सौ. सुषमा साठे यांचे दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"नागपूर येथील गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विषयाच्या जेष्ठ प्राध्यापीका सौ. सुषमा साठे यांचे वयाच्या ५० व्या वर्षी प्रदिर्घ आजाराने २६ सप्टेंबर १९९८ रोजी दुःखद निधन झाले. प्रा. सौ.सुषमा साठे ह्या नुटा संघटनेच्या सक्रिय कार्यकर्ता होत्या. त्यांच्या दुःखद निधनामुळे साठे कुटूंबीयांवर झालेल्या दुःखात नुटा संघटनेचे सर्व सभासद सहभागी आहेत. इश्वर प्रा.सौ. साठे यांच्या आत्माला चिचशांती प्रदान करो ही प्रार्थना."

शोक प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षांनी सुध्दा आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेने दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली. **सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकूल कूटूंबियांकडे पाठवितील असे अध्यक्षांनी सांगितले.**

## विषय क्रमांक. : २३८
## प्रा.बी.टी.देशमुख व श्री. व्ही.यु.डायगव्हाणे यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

कार्यकारी मंडळाच्या वतीने सचिव डॉ.इ.एच.कठाळे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

(अ) दिनांक १३ नोव्हेंबर १९९८ ला झालेल्या निवडणूकीत अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख हे लागोपाठ चौथ्यांदा महाराष्ट्र विधानपरिषदेवर फारमोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत, विधानपरिषदेवर लागोपाठ सातत्याने चौथ्या वेळेला पदवीधर मतदार संघातून निवडून जाणारे प्रा.बी.टी.देशमुख हे पहिले सदस्य आहेत, या निवडणूकीत ते निवडून आल्याबद्दल ही सभा अतिव आनंद व्यक्त करीत आहे. आणि त्यांचे मनापासून अभिनंदन करित आहे.

(ब) नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे श्री.व्ही.यु.डायगव्हाणे महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेवर लागोपाठ दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल ही सभा अतिव आनंद व्यक्त करीत आहे आणि त्यांचे मनापासून अभिनंदन करित आहे.

## विषय क्रमांक. : २३९
## अ.भा. स्तरावरील समझोत्याचे कार्यवृत्त व प्रत्यक्ष केंद्राच्या सुचना यामधील तफावत

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ.इ.एच.कठाळे मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"दिनांक ५ सप्टेबर १९९८ रोजी केंद्र शासनाचे शिक्षणमंत्री व अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व महासचिव यांच्यामध्ये झालेल्या चर्चेचे जे कार्यवृत्त (यापुढे "कार्यवृत्त" असा उल्लेख) केंद्रीय शिक्षण सचिवांच्या सहीने अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना देण्यात आले ते व त्या कार्यवृत्ताची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या ६ नोव्हेंबर १९९८ या तारखेच्या सूचना (यापुढे "केंद्रीय सूचना" असा उल्लेख) यांचे काळजी पूर्वक अवलोकन केले असता काही गंभीर बाबी स्पष्टपणे लक्षात येतात. त्या पुढील प्रमाणे :-

(१) कार्यवृत्तामध्ये "The Government has also agreed to take up the issue of implementation of enhanced scales w.e.f. 01.01.96 with the Cabinet. " असा उल्लेख आहे व

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद १ (i) मध्ये "The revised scales mentioned in Annexure-I of our letter dated 27-7-1998 shall be effective from 1-1-1996. Accordingly, the Annexure-II enclosed with the letter referred to may be treated as withdrawn." असा उल्लेख आहे.

त्याचप्रमाणे कार्यवृत्तामध्ये "Government have further agreed to take up with the Cabinet the issue relating to the fixation of pay scales of Selection Grade Lecturers/Readers who were selected strictly in accordance with the rules and regulations framed by the UGC in consultation with the Government and who were in position as Selection Grade lecturers/Readers on 1.01.96 in a manner that they get their pay fixed at the minimum of Rs. 14,940/- as and when they complete 5 years in the grade." असा उल्लेख असून

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद 1 (ii) मध्ये "The Fixation of pay of lecturers(Selecation Grade)/Readers in the pre revised scale of Rs.3700-12-490-150-5700/-who were selected strictly in accordance with the rules and regulations framed by the UGC and who were in position as lecturers(Selection Grade) / Readers as on 1-1-1996, will be made in a manner that they get their pay fixed at the minimum of Rs. 14940/- in the revised scale of Rs. 12000-420-18300 as and when they complete five years in the grade." असा उल्लेख आहे. **याची ही सभा नोंद घेत आहे.**

(२) कार्यवृत्ताच्या परिच्छेद २ मध्ये "Government would be willing to consider the evolution of a scheme of professional development incentive in the form of cash allowance or assistance in kind or both to those lecturers who register for M.Phil/Ph.D. and whose pursuit of research is considered satisfactory by their guide. The nature and the details of the scheme would be discussed and finalised in consultation with the UGC." असा उल्लेख असून

केंद्रीय सूचनांच्या परिच्छेद ५ मध्ये सुद्धा "The UGC will formulate a scheme, in consultation with the Government, for giving professional development incentives in the form of cash allowances or assistance in kind or both to those Lecturers who register for M. Phil/Ph. D. and whose pursuit of research is considered satisfactory by their guides." असाच उल्लेख आहे. २ महिन्याचा कालखंड उलटल्यानंतरसुद्धा याबाबत कोणतीही कारवाई विद्यापीठ अनुदान आयोगाकडून होऊ नये **याबद्दल हे सभागृह तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

(३) कार्यवृत्ताच्या परिच्छेद ३ मध्ये "The Government has also declared that the UGC would prepare a specific scheme in consultation with the Government to reward and recognise meritorious teachers who may not be M.Phil

or Ph.D. but who have made outstanding contributions in teaching and research. A preliminary communication indicating the views of AIFUCTO in this respect has been received from the UGC. The Scheme as finally formulated by the UGC would be expeditiously cleared by the Government and in any case within four weeks from the receipt of the finally formulated proposal from the UGC." असा उल्लेख असतांना प्रत्यक्ष केंद्रीय सूचनांमध्ये याबाबत कोणताही उल्लेख असू नये **ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे** असे या सभागृहाला वाटते. यापुढील चार आठवड्यात विद्यापीठ अनुदान आयोगाने **याबाबतची योजना निश्चित करून केंद्रशासनाने याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात अशी मागणी ही सभा करीत आहे.**

## विषय क्रमांक. : २४०
## विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठीच्या नविन वेतनश्रेणीची महाराष्ट्रात अम्मलबजावणी

आजच्या आमसभेच्या विषयपत्रिकेवर बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक २ वर विषय क्रमांक २४० अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या ठरावाऐवजी प्रा.सी.डी.कोंगरे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** :-

"दिनांक १० जानेवारी १९९९ च्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मान्य केलेला पुढील प्रस्ताव विचारात घेवून त्याची ठामपणे अम्मलबजावणी करण्यात यावी असा **हे सभागृह निर्णय घेत आहे.** :-

"1. That this meeting of the Executive Committee of the MFUCTO views with grave concern **that the government of Maharashtra has failed to come out with the Government Resolution on the new revised scales of pay for University and College teachers in the State** though the government has been in possession of the central government direction dated 27th July 1998 as also the amended instructions dated 6th November 1998 issued by the HRD Ministry, inspite of more than 5 months having elapsed since the original central order, dated 27th July 1998.

2. That this meeting expresses its protest that inspite of the MFUCTO having submitted to the Chief Minister and the Minister for Higher & Technical Education, the said documents requesting them to issue the GR immediately and in any case on or before 31st December 1998 and **inspite of the fact that 80 per cent of the financial burden on account of the revision of pay scales will be borne by the central government** and inspite of the fact that the revised scales of pay have been implemented in the central universities and also in some of our neighbouring states such as Goa and Gujarat, the State government has neglected to issue the GR. till date.

3 That this meeting of the Executive Committee of the MFUCTO takes another opportunity of calling upon the state Government to issue the said GR on the basis **of the central direction dated 27th July 1998 as amended by central direction dated 6th November 1998, forthwith or in any case, prior to 10th February 1999.**

4. That this meeting resolves further that in case the state government fails to issue the GR on or before 10th February 1999, the teachers in Maharashtra will be compelled to take recourse to staging **Black Flag Demonstrations against the Chief Minister and the Dy. Chief Minister at all District places in the State whenever they visit the Districts starting from 11th February 1999,** and thereafter extend the said Demonstration to all the Ministers in the State, with effect from an appointed date.

5. That this meeting also resolves to issue **ADVERTISEMENTS in all News papers** on an appointed date highlighting the failure of the government of Maharashtra to come out with the GR for implementation of the revised scales of pay even after more than 6 months after the central direction.

6. That this meeting further decides to give a call to the teachers to resort to stoppage of work from any date to be intimated by the MFUCTO to them in due course, without giving any further notice to the government, the communication of this resolution being treated as due notice of the said stoppage-of-work action."

## विषय क्रमांक. २४१ :
## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सवलत, निवृत्ती वेतन, प्रवास सवलत मिळणेबाबत

**(अ)** प्रा.ध.ग.गुडधे यांनी पुढील प्रस्ताव **मांडला.** :-

"समाजकार्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन, वैद्यकीय सवलत, प्रवास सवलत याबाबत ज्या सवलती अकृषि विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयाच्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे लागू आहेत त्याप्रमाणे लागू करण्यात याव्या अशी मागणी ही सभा शासनाला करीत आहे."

**(ब)** प्रस्ताव मांडल्यानंतर अध्यक्षांनी सभागृहाला पुढील प्रमाणे **माहिती दिली** :-

"समाजकार्य महाविद्यालयातील "शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करणे" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३१७३७ ला शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर १९९८ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत मा.समाजकल्याण मंत्र्यांनी "निवृत्ती वेतनाची योजना कोणत्याही आस्थापनेवरील अनुदानित संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादीमधील कर्मचाऱ्यांना लागु करु नये व राज्य शासनाच्या दायित्वात वाढ करु नये असा धोरणात्मक निर्णय दि. ८.७.९६ रोजी मंत्रिमंडळाने घेतला असल्यामुळे निवृत्ती वेतन योजना लागु करणे शक्य होणार नाही" अशा प्रकारचे नकारार्थी उत्तर दिले आहे"

**(क)** सरळसरळ शासनाने ही मागणी फेटाळली असल्यामुळे सभागृहाबाहेर याबाबत काय उपाययोजना करता येतील याचा विचार या ठरावाशी संबंधित सर्व शिक्षकांनी एकत्र बैठक घेऊन करावा **असे ठरले**

**(ड)** याच कारणासाठी उक्त ठराव नुटाच्या कार्यकारी मंडळाकडे विचारार्थ पाठवावा **असेही ठरले.**

## विषय क्रमांक. : २४२
## समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान मिळणेबाबत

प्रा.ध.ग.गुडधे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** :- "शासनाने मान्यता दिलेल्या विना अनुदान तत्वावर सुरू असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांना "अनुदान" अकृषि विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांना ज्याप्रमाणे सुरू आहे त्याप्रमाणेच सुरू करण्यात यावे अशी मागणी ही सभा शासनाला करित आहे. "

## विषय क्रमांक. : २४३
## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संपास पाठींबा

अध्यक्षांनी मांडलेला पुढील प्रस्ताव विचारात घेण्यात आला व **सम्मत करण्यात आला** :-

दिनांक १० डिसेंबर १९९८ पासून महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा जो संप चालू आहे, त्याला हे सभागृह ठाम पाठिंबा व्यक्त करीत आहे. आज गेले ३७ दिवस हा संप चालू असून केवळ "संप मागे घ्या व मगच बोलणी करु" अशाप्रकारची जी भुमिका शासनाने घेतली आहे ती अत्यंत लोकशाही विरोधी अशा प्रकारची भूमिका आहे. शासनाने तत्परतेने संघटनेशी चर्चा करून याबाबत सन्माननीय तोडगा काढावा व विद्यार्थांचे होणारे संभाव्य नुकसान टाळावे अशी ही सभा महाराष्ट्र शासनास विनंती करीत आहे.

## विषय क्रमांक : २४४
## सभा व्यवस्थेबद्दल आभार :

सचिव प्रा.एकनाथ कठाळे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेच्या इतर प्राध्यापकांनी, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांनी, ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.

स्वा / **बी.टी.देशमुख**
*अध्यक्ष*

स्वा / **एकनाथ कठाळे**
*सचिव*

*******

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९८ : मंगळवार, २२ डिसेंबर १९९८*

**सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही.यु. डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी येणाऱ्या अतिरिक्त भाराच्या ८० टक्के भार राज्य शासनाला अदा करण्याची केंद्र शासनाने दाखविलेली तयारी, दिनांक २७ जुलै, १९९८ रोजी व त्यानंतर ६ नोव्हेंबर, १९९८ रोजी याबाबतच्या स्पष्ट सूचना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या शिक्षण खात्याने राज्य शासनाकडे पाठवून त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्या विरोधात महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालय शिक्षकांनी ११ डिसेंबर, १९९८ रोजी काम बंद आंदोलन पुकारणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी महाराष्ट्रात लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री. दत्ता राणे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिनांक २७/०७/१९९८ रोजी केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करून राज्य शासनांनी या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करण्याबाबतचा विचार करावा असे सुचविले होते. त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक ६.११.९८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगास दिनांक २७.७.९८ च्या योजनेत करण्यात आलेले बदल सुचविले होते व **या पत्राची प्रत राज्य शासनास दिनांक १७.११.९८ च्या पत्रान्वये अग्रेषित करण्यात आलेली आहे.** केंद्र शासनाकडून राज्य शासनास पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिलेल्या वेतनश्रेणी संदर्भात राज्य शासनाकडून याबाबतची आवश्यक ती माहिती संकलित करून **आर्थिक भारासह प्रस्ताव सध्या तयार केला असून या प्रस्तावाची छाननी चालू आहे.** केंद्र शासन दिनांक १.१.९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत **वेतन पुनर्रचनेमुळे येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे** व त्यानंतर या संपूर्ण खर्चाची जबाबदारी राज्य शासनाने स्विकारावयाची आहे. केंद्र शासनाच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे त्यामुळे या विभागाने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही असे वाटते. प्रस्तावाची छाननी झाल्यावर व प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यावर याबाबतचे जरूर ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.दिनांक ११.१२.१९९८ रोजी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात हे आंदोलन केले होते.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, जे निवेदन वितरीत करण्यात आलेले आहे त्यामध्ये विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेचा प्रश्न आहे. हा विषय असा आहे की, ज्याच्यामध्ये ८० टक्के अर्थभार केंद्र सरकार सहन करणार आहे. **केंद्र शासनाची दोन पत्रे मिळाल्याचे निवेदनात मान्य करण्यात आलेले आहे.** "केंद्र शासनाच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून कार्यवाही चालू आहे" असेही म्हटले आहे. तरी माझा पहिला प्रश्न असा आहे की, **२७ जुलै, १९९८ आणि ६ नोव्हेंबर १९९८ च्या पत्रान्वये कळविलेल्या वेतनश्रेण्या आहेत त्या कोणत्या तारखेपासून महाराष्ट्रामध्ये अमलात येणार आहेत?**

**श्री. दत्ता राणे** : अध्यक्ष महाराज, लेखी निवेदनामध्ये कालमर्यादेसंबंधी उल्लेख करण्यात आलेला नाही. महाराष्ट्रातील २७ हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. १-१-१९९६ ते ३१-३-२००० सालापर्यंत ९०० **कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी केंद्र सरकारकडून ८० टक्के म्हणजे ७२० कोटी रुपये मिळणार आहेत आणि राज्य सरकारचे २० टक्के म्हणजे १८० कोटी रुपये होतात.** २००० सालानंतर ही योजना राबविण्याकरता प्रत्येक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने २११ कोटी रुपयांची तरतूद करून ही योजना पुढे चालू ठेवावयाची आहे. आरोग्य खाते, कृषी खाते आणि इतरही काही खात्यांमध्ये अशा प्रकारचा प्रश्न आहे. ६ तारखेला जे त्यांनी पत्र पाठविले होते त्या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की या योजनेसंबंधी काही अडचणी येत असतील तर केंद्र सरकारकडे त्याबाबत विचारविनिमय करावा. खात्याने सगळी तयारी करून हा प्रस्ताव वित्त विभागाकडे दिला. वित्त विभागाकडून या प्रस्तावावर छाननी सुरू झाली आहे. त्याचबरोबर निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यानंतर याबाबतचे जरूर ते आदेश निर्गमित करण्यात येतील. तेव्हा या संदर्भात मी आपल्याला शासनाच्या वतीने अशी विनंती करतो की वेळ **काही आज सांगता येणार नाही. म्हणूनच मी लवकरात लवकर हा शब्द वापरतो.**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माझा प्रश्न अगदी साधा आहे. या शिक्षकांना वेतनश्रेणी कोणत्या तारखेपासून लागू करणार आहात?

**श्री.दत्ता राणे** : दिनांक १-१-१९९६ पासून २००० सालापर्यंत वेतनश्रेणी देण्याच्या बाबतीत केंद्र सरकारचे पत्र आलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : केंद्र सरकारचे पत्र मी विचारलेले नाही. त्याबद्दल मला उत्तर नको आहे. माझा साधा प्रश्न असा आहे की, केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे या वेतनश्रेणीची पुनर्रचना महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना केव्हापासून लागू करण्यात येणार आहे?

**श्री.दत्ता राणे** : ही तारीख निश्चितपणे सांगता येणार नाही. केंद्र सरकारकडून जे पत्र आलेले आहे त्यामध्ये दिनांक १-१-९६ पासून असा उल्लेख आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : महाराष्ट्रातसुद्धा १-१-१९९६ पासून ही वेतनश्रेणी लागू होईल काय?

**श्री.दत्ता राणे** : १-१-१९९६ पासून २००० सालापर्यंत आपल्याला किती खर्च येणार आहे हे मी आपल्याला सांगितले आहे. **परंतु केव्हापासून लागू करावयाची हे तपासून पाहण्यात येत आहे.**

**दुरुस्ती : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे.**

*महाराष्ट्र विधानपरिषदेत "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे." या विषयावर मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर रोजी झालेल्या चर्चेचे इतिवृत्त १ जानेवारी १९९९ च्या बुलेटीनच्या पृष्ठ ३ व ४ वर सदस्यांच्या माहितीकरता प्रसृत करण्यात आले होते. प्रसृत करण्यात आलेला मजकूर बिनचुक आहे. मात्र बराच मजकुर अनवधानाने गळल्या गेला. पुर्व प्रसिद्ध मजकुरांत गळलेल्या मजकुराची भर घालून या चर्चेचे संपूर्ण इतिवृत्त पुनःप्रसिद्ध करीत आहोत.*- ***संपादक***

**No.CIM/5 : : Dated 17th January 1999**

**CORRECTION**

**in the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 Noon on SUNDAY, the 17th January,1999 at B.D.Parwekar Mahavidyalaya, Pandharkawada Distt. Yavatmal is circulated in this NUTA Bulletin. If you propose to suggest any Correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (**Prof.E.H.Kathale,** Secretary, **NUTA,** N-162 Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the Corrections received after the due date to be included in the List of Corrections for consideration.

Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3 Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

******

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी विचारविनिमय करावा लागेल आणि त्यासाठी वेळ लागेल परंतु या वेतनश्रेणी १-१-९६ पासून लागू करणार आहात काय?

**श्री.दत्ता राणे** : त्या संदर्भात केंद्र सरकारने जे पत्र पाठविलेले आहे त्यात १-१-९६ पासून लागू केल्या आहेत असे म्हटलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : त्यांनी १-१-९६ पासून लागू केल्या आहेत. अंमलबजावणी सुद्धा त्यांनी सुरू केलेली आहे. आपल्याकडे केव्हा पासून लागू करणार?

**श्री.दत्ता राणे** : त्या पत्रामध्ये त्यांनी असा आग्रह धरला आहे की दिनांक १-१-९६ पासून या वेतनश्रेणी लागू कराव्यात. त्यांनी शासनाला पत्र पाठविलेले आहे. १७ नोव्हेंबर १९९८ रोजी त्यांनी पुन्हा दुसरे पत्र पाठविले असून त्या पत्राला फक्त ४५ दिवस झालेले आहेत. दिनांक १-१-१९९६ पासून या वेतनश्रेणी लागू केल्यात तर किती वित्तीयभार पडतो यासंबंधी प्रस्ताव तपासून पाहण्यात आला असून वित्तीय भार किती पडेल याची आकडेवारी मी मघाशी सांगितली आहे. या वेतनश्रेणी केव्हापासून लागू करावयाच्या यासंबंधी जो पर्यंत कॅबिनेट निर्णय होत नाही, शासन आदेश काढत नाही तोपर्यंत मला काही सांगता येणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : कॅबिनेटमध्ये निर्णय झाल्यानंतर शासन आदेश काढण्यात आल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरू होईल. महाराष्ट्रात इतर सर्व वर्गांना १-१-९६ पासून या वेतनश्रेणी लागू करण्यात आलेल्या आहेत. आपल्याकडे सुद्धा १-१-९६ पासूनच लागू करणार आहात काय?

**श्री.दत्ता राणे** : उत्तरामध्ये त्यासंबंधी सांगण्यात आलेले आहे. यासंबंधीचा अंतिम निर्णय अजून व्हावयाचा आहे. वित्तीय भार किती पडेल याची आकडेवारी मी आताच सांगितलेली आहे. जोपर्यंत हा प्रस्ताव वित्त विभागाकडून तपासून शासनाकडे येत नाही, **जोपर्यंत कॅबिनेट निर्णय होत नाही तोपर्यंत मी काही सांगू शकत नाही.**

**सभापती** : केंद्राच्या आदेश वा परिपत्रकामध्ये त्यांनी १.१.१९९६ पासून ही नवी वेतनश्रेणी लागू केल्याचे म्हटले आहे तर महाराष्ट्रात ही वेतनश्रेणी १.१.९६ पासून लागू केली तर त्यामुळे वित्तीय भार किती पडेल याचा अभ्यास चालू आहे आणि तो अभ्यास पूर्ण झाल्यानंतरच या नवीन वेतनश्रेणी केव्हापासून लागू करावयाच्या याचा निर्णय घेतला जाणार आहे. त्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही असे माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे, बरोबर आहे ना?

**श्री.दत्ता राणे** : होय.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, सन १.१.१९९६ पासून या वेतनश्रेणी लागू करण्याविषयीचा निर्णय आपला झालेला नसेल तर त्या लागू करण्यासंबंधात... माझे म्हणणे असे आहे की, दरवेळेस लोकांनी संप केल्यानंतरच त्याबाबतचा निर्णय आपण घेणार आहात काय? १५ लाख शासकीय कर्मचाऱ्यांना आपण १.१.९६ पासून लागू केले आहे, तर मग यांच्याबाबतीत आपण नवीन वेतनश्रेणी केव्हापासून लागू करणार आहात?

**श्री.दत्ता राणे** : अध्यक्ष महाराज, मी मघाशी सांगितल्यानुसार ४५ दिवसात एवढी प्रोसेस आपली झालेली आहे. त्या दृष्टीने वित्त विभागाकडे सर्व गोष्टी पाठविल्या आहेत. दुसरे असे की, हे काही केवळ या एकाच बाबतीत करायचे आहे असे नाही तर इंजिनिअरिंग कॉलेजेस आहेत, मेडिकल कॉलेजेस आहेत त्या सगळ्यांच्याच बाबतीत आपल्याला विचार करावा लागणार आहे.

**श्री.सुरेश भालेराव** : अध्यक्ष महाराज, यामध्ये उगाचच गोंधळ घालण्याचा प्रयत्न चालला आहे असे वाटते. कारण माननीय मंत्री महोदयांनी १.१.१९९६ पासून ह्या वेतनश्रेणी महाविद्यालयीन प्राध्यापकांना देण्याचे यापूर्वीच कबूल केलेले आहे. यामध्ये पहिल्यांदा केंद्र सरकारकडून राज्य सरकारला पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार त्यांच्याकडे वेतनश्रेणी दिल्यासंबंधात पत्र दिले आहे आणि तशी ती आपल्या राज्यात लागू करण्याबाबत देखील त्यांनी म्हटले आहे. त्यासाठी १.१.१९९६ पासून ३१.३.२००० पर्यंत ८० टक्के रक्कम केंद्र सरकार देणार आहे असेही त्यांनी सांगितले आहे आणि त्यानंतर तिसरे म्हणजे केंद्र सरकारच्या या पत्रानुसार राज्य सरकारकडून कार्यवाही चालू आहे. अध्यक्ष महाराज, ही सारी उत्तरे त्यांचीच आहेत. कदाचित त्यांचाच यामध्ये काही गोंधळ उडत असेल.

**श्री.दत्ता राणे** : अध्यक्ष महाराज, यात म्हटले आहे की राज्य सरकारने स्वीकारावयाचे आदेश, अध्यक्ष महाराज, यामध्ये २० टक्के रक्कम ही राज्य सरकारने स्वीकारायची आहे आणि **त्याबाबतचा निर्णय झाल्याशिवाय ते कसे करावयाचे?**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ही वेतनश्रेणी लागू केल्यास २० टक्के रक्कम राज्य सरकारने आणि ८० टक्के रक्कम केंद्र सरकारने द्यायची असे आहे. म्हणजे यामध्ये ८० टक्के रक्कम केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतरही आपण १.१.१९९६ पासून हे लागू करू म्हणून सांगत नाही. सन्माननीय सदस्य श्री. भालेराव यांनी लक्षात घ्यावे की हे काही उगाच गोंधळ घालत नाहीत. खरे तर १.१.१९९६ पासून हे लागू करू असे सांगण्यास मंत्रीमहोदय तयार नाहीत. मग मी आपल्याला सांगतो की, आपल्याला केंद्राकडून आलेले मूळ पत्र हे २७ जुलैचे आहे. म्हणजे ६ महिने झाले, तेवढा अवधी आपल्याला अगोदरच मिळाला आहे. असे असता केवळ ४५ दिवसांचे आपण काय सांगता आहात? डिसेंबरच्या १० तारखेला आपण शासकीय कर्मचारी व इतरांच्या बाबतीतील शासननिर्णय निर्गमित केले आहेत तर मग यांच्या बाबतीत आपण किमान पुढील महिन्याच्या १० तारखेला तरी शासननिर्णय निर्गमित कराल काय? आपण १.१.१९९६ पासून साऱ्या जगाला जर दिले

# HIGH COURT : O.O.C.J.

## *WRIT PETITION NO. 1941 OF 1982*

1. Bombay University and College Teachers Union, having its office at Kimatrai Building, 79, Maharshi Karve Marg, Bombay - 400 002.

2. Eknath Narayan Manjrekar of Bombay Indian Inhabitant, residing at 6/84, Shivanand Society, Playground Cross Road, Vile Parle (East), Bombay 400 057...... **Petitioners**

V/s

1. University of Bombay having its Registered office at M.G.Road, Bombay 32.

2. Principal, Parle College, having his Registered office at Dixit Road, Vile parle (East), Bombay 400 057

3. State of Maharashtra ....... **Respondents**

Shri. J.P.Cama for the petitioners, Shri.M.B.Palshikar for respondent No. 1

Respondents 2 and 3 absent (though duly served).

**Coram : Pendse J.**

Tuesday, August 5, 1986.

Oral Judgment :

1. Petitioner No. 1 is a Union of College teachers, while petitioner No. 2 is a teacher working in parle College, the principal of which is respondent No. 2. On April 12, 1982 petitioner No. 1 gave **call to its members to take leave from their work on April 19, 1982 to show their support to the striking textile employees**. The members were advised to apply for casual leave on April 19, 1982, and accordingly some of the teachers of the parle College applied for casual leave on April 17, 1982 . The applications for casual leave were neither rejected nor granted by the College Administration and **the teachers remained absent from work on the relevant date.** When the teachers went to collect their wages at the end of the month, The administration informed them that the question as regards payment of one day on which the teachers remained absent would be considered in meeting of the Association of principals of various colleges in Bombay. Subsequently, the petitioners learnt that the Association of Principals left the question for determination of the state Government, and on **May 4, 1982 the members of the teaching staff were informed that their applications for casual leave stand rejected and their absence on April 19, 1982 is treated as absence without permission.** The action of the administration is under challenge.

2. Shri Cama, learned counsel appearing on behalf of the petitioners, is right in his submission that **it is not permissible for the administration to treat the absence of the teachers as absence without permission.** The teachers had applied for casual leave to show their solidatiry to the textile employees, who were on strike for a considerable length. The teachers had not remained absent without informing the administration but on the other hand the teachers applied for casual leave. **In case the employees are entitled to take the casual leave, then it is difficult to appreciate how the administration can refuse applications on the ground that their absence would be treated as one without pay.** The administration cannot ignore that the college teachers are paid their wages for the work which they carry out in the whole month and it is not permissible to withhold the wages because of absence of one day. It is, therefore, not possible to sustain the decision taken by the administration.

3. Accordingly, **petition succeeds and the rule is made absolute in terms of prayer(a),** but with a condition that the teachers who had applied for casual leave on April 17, 1982 had on that day such leave available to them. There will be no order as to costs.

*******

आहे तर यांना देण्यास आपली हरकत आहे काय? आपल्या उच्च शिक्षण विभागाने नवीनच वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून लागू करण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे का? असल्यास त्याबाबतचा निर्णय केव्हा आपण घेणार आहात?

**श्री. दत्ता राणे :** अध्यक्ष महाराज, या पत्रामध्ये सुद्धा त्यांनी आम्हाला विनंती केलेली आहे. २७ जुलैचे जे पत्र आहे त्यातसुद्धा त्यांनी म्हटले आहे की, "the implementation of the scheme may be brought to the notice of the deptt. of education ministry of human resource development." परंतु त्यामुळे या सगळ्यांची कारवाई चालू आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** पण मग काय ॲनॉमली त्यांच्या लक्षात आणून दिली ? सभागृहामध्ये अशा प्रकारे हवेत बोलायचे काय?

**सभापती :** मला जे समजले आहे त्यानुसार सन्माननीय सदस्य श्री.भालेराव म्हणतात त्याप्रमाणे यामध्ये मंत्र्यांचा काहीही गोंधळ नाही. तर या वेतनश्रेणी कोणत्या तारखेपासून महाराष्ट्रात लागू करावयाच्या यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारचा झालेला नाही असे मंत्र्यांना आपल्याला सांगावयाचे आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मग हे काय आहे? १.१.९६ पासून हे लागू करायचे नाही असे जे त्यांचे म्हणणे आहे ते तर निषेधार्ह आहे. केव्हापासून अमलात आणणार त्याचे उत्तर ते देत नाहीत.या बाबतीत केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे याबाबतचे सुद्धा उत्तर देण्यात येत नाही हे बरोबर आहे काय?

**श्री.दत्ता राणे :** मी सुरुवातीलाच याबाबत सांगितले आहे. या ठिकाणी जे पत्र देण्यात आले आहे **त्याप्रमाणे विद्यापीठामध्ये नियम तयार केले पाहिजेत.** तसेच इतरही अनेक प्रकारच्या सूचना आहेत. आता त्या सूचनांप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे. म्हणून या ठिकाणी निश्चित असा वेळ सांगता येणार नाही. लवकरात लवकर असे शब्द मी वापरले आहेत. **निश्चित अशी वेळ आणि भूमिका मी या ठिकाणी सांगू शकत नाही.**

**श्री.सुरेश पाटील :** माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी निश्चित असे उत्तर देत नाही. या ठिकाणी वेळ लागणार आहे, हे मला मान्य आहे. मला याठिकाणी असे विचारावयाचे आहे की, ज्यावेळी ही वेतनश्रेणी लागू केली जाईल, तेव्हा ती १.१.१९९६ पासून लागू केली जाईल काय?

**श्री.दत्ता राणे :** या ठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "केंद्र शासन दि.१.१.१९९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत वेतन पुनर्रचनेमुळे येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे व त्यानंतर या संपूर्ण खर्चाची जबाबदारी राज्य शासनाने स्विकारावयाची आहे." **ही पॅकेज डील आहे. या ठिकाणी ६२ सालाच्या वयाचाही संबंध आहे.** या ठिकाणी ज्या अटी आहेत, त्या पाहूनच आर्थिक तरतूद करावयाची आहे. या ठिकाणी आपणाला २० टक्क्याची आर्थिक तरतूद करावयाची आहे. या बाबत वित्त विभागाकडून ही बाब मंत्रिमंडळासमोर येणार आहे. **शासनाची याला मंजुरी मिळाल्यानंतरच शासन या बाबत जरूर ते आदेश निर्गमित करील.**

**श्रीमती संजीवनी रायकर :** केंद्र शासन १.१.१९९६ ते ३१.३.२००० पर्यंत वेतन पुनर्रचनेमुळे येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे सहाय्य देणार आहे. यामध्ये २० टक्के रक्कम देण्याचा प्रश्न आहे. त्यामध्ये काहीच अडचण नाही. दि.१.१.१९९६ पासून आपण इम्प्लीमेंट करणार आहात काय? बाकीच्या ज्या अटी आहेत त्या बाबत नंतर विचार करावा. म्हणून या बाबीसाठी मंत्रिमंडळासमोर जाण्याची तशी आवश्यकता नाही. म्हणून आता ही मागणी शासन मान्य करणार आहे की नाही?

**श्री.दत्ता राणे :** माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे विचार व्यक्त केले आहेत तसेच ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, **त्या कॅबिनेटमसोर मांडण्यात येणार आहेत.**

**श्री. व्यंकाप्पा पतकी :** निवेदनात असे म्हटले आहे की, "केंद्र शासन दिनांक १.१.१९९६ ते ३१.३.२००० या सालापर्यंत वेतन पुनर्रचनेमुळे येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के सहाय्य देणार आहे." या सरकारने फक्त मान्य करतो की नाही ते सांगावे.

**श्री.दत्ता राणे :** सभापती महोदय, या बाबत उत्तर दिले आहे.

**श्री.अनिल देशमुख :** सभापती महोदय, हा विषय मान्य-अमान्यचा नाही. या संबंधात शिफारस करण्याचे काम आहे. म्हणून या बाबतची संपूर्ण तपासणी करून, **छाननी करून शासन योग्य तो निर्णय घेणार आहे.**

**श्री. जयवंत ठाकरे :** सभापती महोदय, महाविद्यालयीन प्राध्यापकांना दि.१.१.१९९६ पासून वेतनश्रेणी लागू करण्याच्या बाबतीत केंद्र शासनाने सांगितले आहे. आता ही वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून करण्यात येईल असे सांगितले जात नाही. या ठिकाणी प्रोसीजर पाळली जात नाही, हे बरोबर नाही. दि.१.१.१९९६ पासून ही वेतनश्रेणी लागू केली जाईल काय? हा प्रश्न आहे. याबाबत शासन आपला विचार मांडणार आहे की नाही? तसेच यासाठी किती निधीची तरतूद केली जाणार आहे?

**श्री.अनिल देशमुख :** सभापती महोदय, या ठिकाणी मंत्रिमहोदयांनी शासनाची भूमिका स्पष्ट सांगितली आहे. किती निधी लागणार आहे याचा हिशेब लावण्याचे काम चालू आहे. ते झाल्यानंतर कॅबिनेटसमोर ही बाब गेल्याशिवाय निर्णय होवू शकणार नाही. त्याकरिता या खात्याचे मंत्री आणि राज्यमंत्री **म्हणून १.१.१९९६ पासून लागू केले पाहिजे अशी शिफारस करू.** परंतु शेवटी कॅबिनेट यासंबंधी निर्णय घेणार असल्यामुळे त्याअगोदर उत्तर देता येणार नाही.

**श्री.अशोक मोडक :** लक्षवेधीचे निवेदन वाचल्यानंतर आणि त्यावरील उत्तरे ऐकल्यानंतर सदनाचे असे मत झाले आहे की, केंद्र सरकारच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून याबाबत आतापर्यंत कारवाई झाली नाही. त्यासंबंधी फक्त चर्चा आणि चिंता व्यक्त झाली. या ठिकाणी उत्तर देण्यात आले आहे त्यात कार्यवाहीचा अर्थ इंम्पलिमेंटेशन असे मानायला मी तयार नाही. कारण याबाबत ठोस निर्णय झाला नाही म्हणून दुर्दैवाने हा विषय आला आहे. मंत्रिमहोदयांच्या एका वाक्याशी मी सहमत आहे, नोव्हेंबरच्या अमूक तारखेला हे पत्र आले, त्यावेळी पुरेसा वेळ नव्हता त्याबाबत त्यांनी अडचण सांगितली हे ठीक आहे. **तेव्हा याबाबत चर्चा झाल्याशिवाय जोपर्यंत निर्णायक अशाप्रकारचा विचार होत नाही तोपर्यंत या चर्चेला पूर्णविराम मिळेल असे म्हणता येणार नाही.**

**श्री.दत्ता राणे :** मी सुरुवातीला यासंबंधी सांगितले आहे आणि माझा याबाबतचा विचार पक्का आहे. कारण हा वित्तभाराचा प्रश्न आहे. म्हणून याबाबत कॅबिनेटसमोर विचार झाला पाहिजे. त्यामध्ये दुसऱ्या खात्याचा प्रश्न देखील आहे. त्यामुळे यामध्ये पॅकेज डीलमध्ये देण्यासंबंधीची अट आहे. म्हणून त्याबाबत एकत्रित विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही. याठिकाणी आपण सर्वांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते मी कॅबिनेटसमोर आणीन. परंतु त्याबाबत आता उत्तर देता येणार नाही.

**सभापती :** ही लक्षवेधी सूचना संपण्यापूर्वी मी त्याबाबत शासनाला निर्देश देत नाही किंवा शासनाला निर्देश देवून अडचणीत आणीत नाही परंतु **यासंबंधी माझे अभिप्राय मी स्पष्टपणे व्यक्त करतो. यासंबंधी इतका वेळ लागल्यानंतर सुद्धा आपल्याला ही वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून द्यावी लागणार आहे हे माहीत आहे.** ती न देण्याच्या बाबतीत शासनाने निर्णय केला तर त्या विरोधात न्यायालयीन प्रक्रिया यापूर्वी झाली आहे तशी यापुढील काळात झाल्याशिवाय राहणार नाही. देशभरच्या प्राध्यापकांनी यासंबंधी ४७ दिवस संप केला आहे. आणि केन्द्रीय शिक्षण मंत्र्यांनी ही गोष्ट मान्य केली आहे. राज्य सरकारकडे याबाबतीत पत्र आले आहे. त्यासंबंधी प्रत्यक्ष कार्यवाही व्हायला वेळ लागेल. **कारण पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जे वेतन अमुक तारखेपासून द्यावे लागणार आहे ते देण्याच्या बाबतीत शासनाने तत्त्वतः अशाप्रकारचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत प्रत्यक्ष कार्यवाहीला वेळ लागणार असला तरी तशाप्रकारे तत्त्वतः निर्णय घेण्यात आला होता. आणि म्हणून यासंबंधी तशाप्रकारे तत्त्वतः निर्णय घेणे आवश्यक होते तो झालेला नाही ही गोष्ट बरोबर झाली नाही.** यासंबंधी आपल्याला जेंव्हा केव्हा निर्णय करायचा असेल तेव्हा तो आपण करू शकता.

**श्री.व्यंकाप्पा पतकी :** सभापती महोदय, या ठिकाणी निश्चित कालावधी कळला पाहिजे.

**सभापती :** मी ते बंधनकारक करीत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आपण आपला अभिप्राय दिला असल्यामुळे आम्ही सभात्याग करीत नाही. आपण शासनाला आदेश दिला नाही. निदेश दिला नाही. आपण आपला अभिप्राय व्यक्त केला. त्याचे महत्त्व आम्हाला कळते. त्यांनाही कळावे.मी या ठिकाणी दोन गोष्टींच्या बाबतीत निषेध व्यक्त करतो. **२७ जुलै १९९८ ला पत्र आले की ८० टक्के केंद्र शासन मदत देईल. तरीही अजून यांचा निर्णय झाला नाही. तो निर्णय केव्हापासून अंमलात येणार हेही सांगत नाहीत.** त्याबद्दल मी निषेध व्यक्त करतो. त्याचप्रमाणे पुढील अधिवेशनांपर्यंत निर्णय करण्यासंबंधी देखील ते हो म्हणत नाहीत. दरवेळेला लोकांनी संप केल्यानंतरच आपण निर्णय घेणार काय? शासनाच्या या वृत्ती बद्दल मी निषेध व्यक्त करतो. **खरे म्हणजे आम्ही सभात्यागच करणार होतो. पण आपल्या अभिप्रायाचे महत्त्व लक्षात घेता यांच्या या धोरणाबद्दल आम्ही निषेध व्यक्त करतो.**

******

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

***महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघ***

# संप सुरु केल्याशिवाय, निर्णय घ्यायचाच नाही, हे योग्य आहे काय?

*महाराष्ट्र शासनाने केवळ विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापक वगळता, इतर सर्व नोकरवर्गांच्या नव्या वेतनश्रेण्या जाहिर करुन, त्यांच्या अम्मलबजावणीचे आदेशही जारी केलेले आहेत. फक्त प्राध्यापकांना त्यातून वगळण्यात आले आहे. हा शासनाचा भेदभाव निषेधार्ह आहे.*

"प्राध्यापकांच्या नव्या वेतनश्रेणी साठी पहिल्या ४-५ वर्षात सोसावयाच्या एकूण ९०० कोटी रुपयाच्या जादा भारापैकी ७२० कोटी रुपये केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास देऊ केलेले आहेत. तेही महाराष्ट्र शासनाने अद्याप आणलेले नाहीत. केंद्र शासनाने प्रथम २७ जुलै, १९९८ रोजी ह्या संबंधी कळविल्यानंतर, पुन्हा ५ डिसेंबर, १९९८ रोजी महाराष्ट्र शासनांस कळविले आहे की, येणाऱ्या जादा खर्चाच्या ८० टक्के रक्कम तातडीने घेऊन जावी. तरीही महाराष्ट्र शासन ह्याबाबत निष्क्रीय आहे. कसल्याही प्रकारचा निर्णयच महाराष्ट्र शासनाने अद्याप घेतलेला नाही.

*त्यामुळे "एम्फक्टो" या प्राध्यापक महासंघाने ११ फेब्रुवारी, ९९ पासून केवळ नाईलाजाने पुन्हा आंदोलन करण्याचा ठराव केला आहे. मुख्यमंत्री नामदार मनोहर जोशी व उपमुख्यमंत्री नामदार गोपीनाथ मुंडे यांच्या समोर प्राध्यापक महाराष्ट्रभर त्यांच्या कार्यक्रमाच्यावेळी जिल्हास्थळी*

# काळे झेंडे दाखवून निदर्शने

[illegible]

## कामकाज बंद करतील.

*सदरहू जाहिरात नुटाच्या नागपूर / अमरावती / ...................... या जिल्हा युनिटतर्फे प्रकाशित करण्यात आलेली आहे.*

**वर दिलेला जाहिरातीचा नमूना आहे. : जाहिरात आंदोलनाच्या अम्मलबजावणीचे तपशील**

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयाप्रमाणे जाहिरात आंदोलनाच्या यशस्वीतेसाठीची सर्व जबाबदारी ही जिल्हा युनिटने पार पाडावयाची आहे.**

(१) पहिली जाहिरात ही दिनांक १ फेब्रुवारी १९९९ च्या सर्व वृत्तपत्रात प्रसिद्ध व्हावी अशी योजना आहे. (२) त्या त्या जिल्ह्याच्या युनिटने त्या त्या ठिकाणच्या वृत्तपत्रामध्ये ही जाहिरात द्यावयाची आहे. (३) त्या त्या ठिकाणी जिल्हा युनिटने हे जाहिरात आंदोलन यशस्वी करण्याकरिता जिल्हा युनीटच्या किंवा कृती समितीच्या व लोकल युनिटच्या बैठकी घ्याव्या. या आंदोलनासाठी आवश्यक तो निधी उभा करावा व त्याच स्तरावर तो खर्च करावा असे ठरविण्यात आले आहे. (४) त्या त्या वृत्तपत्राच्या एका पृष्ठाच्या एकूण आकाराच्या एक चतुर्थांशापेक्षा ही जाहिरात आकाराने लहान नसावी.

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER : Prof. V.K. Pande,**7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,**WARDHA-442 001.** Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** ATI 83 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **22 - 01 - 1999**

**if Undelivered please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,.............................................................................
.............................................................................
.............................................................................